महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

फेब्रुवारी २०१४
वर्ष ९ वे : अंक ८



## हितगुज

- पुनर्रचित गतिमान विद्युत विकास सुधारणांमुळे मानवी हस्तक्षेपाशिवाय वितरण यंत्रणेची सद्यस्थिती निर्धारीत.
- ही यंत्रणा अचूकपणे व सक्षमपणे कार्यरत राहण्यासाठी संबंधीतांनी येणारा प्रत्येक नवीन ग्राहक, नवीन यंत्रणा यांच्या नोंदी वेळच्या वेळी कुठल्याही विलंबाशिवाय अद्ययावत करायला हवे. यासाठी गरज आहे प्रत्येकाने शिस्तबध्दपध्दतीने, जाणीवपूर्वक थोडी जास्त काळजी घेण्याची.

एकूण वितरण व वाणिज्यिक हानी हा विद्युत क्षेत्रात कायम चर्चेचा व चिंतेचा विषय राहिलेला आहे. विद्युत वितरण व्यवस्थेची स्थिती आणि गती या एका मापदंडाने सहजपणे कळते. याचे निदान अचूकपणे व्हावे यासाठी केंद्र शासनाने पुनर्रचित गतिमान विद्युत विकास सुधारणा कार्यक्रमाची योजना केली. माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे, मानवी हस्तक्षेपाशिवाय वितरण यंत्रणेची सद्यस्थिती निर्धारीत करायची. ऊर्जा अंकेक्षण व लेखा परिक्षण मांडायचे. माहिती तंत्रज्ञानाच्याच आधारे ग्राहक सुविधा केंद्रे उभी करायची. अशा महत्त्वाच्या बाबी या प्रकल्पाच्या भाग 'अ' मध्ये होत्या.

आपल्या माहिती तंत्रज्ञान विभागाचा देशाच्या विद्युत क्षेत्रात एक वेगळा नावलौकिक आहे. भाग 'अ' ची कामे सक्षमपणे पूर्ण करणारे आपले राज्य आहे. मुळात या प्रकल्पासाठी ३० हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली शहरे निवडायची असा निकष होता. आपल्या राज्यात अशी १२८ शहरे आपण निवडलेली आहेत. या १२८ शहरातील १,५७५ कार्यालयांत आपण माहिती तंत्रज्ञान यंत्रणा उभी केली आणि ही यंत्रणा मुंबईतील प्रकाशगंगा कार्यालयात असलेल्या अत्यंत अद्ययावत अशा डेटा सेंटरशी जोडलेली आहे. येथे काही तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यास नागपूर येथे आपण आपत्कालिन डेटा सेंटर उभे केलेले आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून मिळणाऱ्या सेवांचा लाभ केवळ या १२८ शहरांना होत नाही तर आपण राज्यात सर्वत्र यातील फायदे उपलब्ध करून दिलेले आहेत. या पध्दतीने संपूर्ण राज्यालाच या योजनेतून मिळणारे फायदे केवळ आपल्या राज्यातच आपण उपलब्ध करून देऊ शकलो. इतर राज्यात भाग 'अ' मधील बरीच कामे व्हायची आहेत.

भाग 'अ' मुळे आपले १०० आसनी मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्र सुरु झालेले आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येथे तक्रारी नोंदविता येतात. ह्या तक्रारी केवळ लँड लाईनवरूनच नाही तर कुठल्याही कंपनीच्या मोबाईलवरून नोंदविता येतात. आपले सर्व वर्गवारीतील ग्राहक आपल्या कार्यालयात न येता जोडणीसाठी ऑनलाईन अर्ज करू शकतात. घरबसल्या त्याचा पाठपुरावाही करू शकतात. ऑनलाईन वीजदेयक भरण्याची सुविधा यापूर्वीच मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झालेली आहे. औद्योगिक आणि मोठ्या प्रमाणात वापर असलेल्या ग्राहकांचे स्वयंचलित मीटर वाचन (एएमआर) होते. यामुळे सर्वात जास्त वापर असलेल्या व महसुल देणाऱ्या या ग्राहकांना आणखी चांगली सेवा देणे शक्य झालेले आहे. विभागनिहाय ऐवजी फिडरनिहाय ऊर्जा अंकेक्षण याच यंत्रणेच्या बळावर आपण करतो. या फिडरनिहाय ऊर्जा अंकेक्षणाची घडी बसेपर्यन्त यात काही व्यवहार्य अडचणी आहेत. यात सुसूत्रता यावी यासाठी आपण अत्यंत पारदर्शकपणे यातील अडचणी समोर आणून त्याचे विश्लेषण करतो. त्यात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करतो. अशा पध्दतीने राज्यात सर्वत्र या सेवांचा वापर आपण सुरू केलेला आहे.

यात भाग 'ब' मध्ये वितरण यंत्रणेत प्रणाली सुधारणा करणे, यंत्रणेचे सक्षमीकरण करणे अपेक्षित आहे. वाहिनी व फिडर्सवर मीटर लावणे, वितरण रोहित्र, वाहिन्या, लघुदाब वाहिनी, खांब, ११ किव्हो आणि त्या खालील यंत्रणेचा जीआयएस नकाशा तयार करणे, माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मीटरवाचन, देयक आकारणी, वसुली, लेखा अंकेक्षण, ग्राहकांच्या तक्रारी सोडविणे इत्यादी कामे करायची आहेत.

या योजनेतील १२८ पैकी ८६ शहरांची सर्व कामे पूर्ण झाली असून आपण 'गो लाईव्ह' म्हणजे माहिती तंत्रज्ञानावर आधारित विविध सेवांचा वापर करण्यास ही शहरे सक्षम असल्याचे जाहीर केले आहे. या शिवाय ११५ शहरांतील तब्बल ४३ लाख ग्राहकांचा जीआयएस नकाशा आपण पूर्ण केला. ९३ शहरांतील हानीचे प्रमाण या यंत्रणेच्या मदतीने आपण निर्धारित केले. आता ही तयार असलेली सर्व यंत्रणा प्रत्यक्ष वापरासाठी आपल्या स्थानिक संचालन व सुव्यवस्था विभागांकडे वर्ग करायला सुरुवात केलेली आहे. ही यंत्रणा अचूकपणे आणि सक्षमपणे कार्यरत राहण्यासाठी संबंधित स्थानिकांनी काही मुलभूत पथ्ये पाळणे गरजेचे आहे. त्यांनी त्यांच्याकडे येणारा प्रत्येक नवीन ग्राहक, नवीन यंत्रणा याच्या नोंदी वेळच्या वेळी, कुठल्याही विलंबाशिवाय, अद्ययावत करणे अपेक्षित आहे. ही यंत्रणा सातत्याने अद्ययावत केल्यास आपले श्रम मोठ्या प्रमाणात वाचून ग्राहकांना आणखी चांगली सेवा देण्यात आपण यशस्वी होऊ. गरज आहे प्रत्येकाने शिस्तबध्दपध्दतीने, जाणीवपूर्वक थोडी जास्त काळजी घेण्याची.

**अजय मेहता**
व्यवस्थापकीय संचालक

## दैनंदिन कामात एचआरएमएस प्रणालीचा वापर करावा



आढावा बैठकीस मार्गदर्शन करताना श्री. सुभाष कालेवाड.

महावितरण कंपनीतील माहिती, अहवाल हे मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालीचा आरसा आहे. एचआरएमएसमधील माहितीची अचूक नोंद काही प्रकरणात होत नाही. त्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एचआरएमएसमध्ये अचूक माहितीची नोंद वेळेत करावी, असे आवाहन महाव्यवस्थापक (मासं/व्यवस्थापन प्रणाली) श्री. सुभाष कालेवाड यांनी केले.

औरंगाबाद परिमंडलाच्या सभागृहात मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालीबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी बोलताना श्री. कालेवाड म्हणाले की, कर्मचाऱ्यांचे वेतन, रजा, बदली प्रकरणे, गोपनीय अहवाल, अपघात, विमा, शिष्यवृत्ती, भविष्य निर्वाह निधी, रजा रोखीकरण इत्यादी कामे मानव संसाधन प्रणालीद्वारे करण्यात येत आहेत.त्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी अद्ययावत व अचूक माहितीची नोंद करावी.

याप्रसंगी उपमुख्य औद्योगिक संबध अधिकारी श्रीकृष्ण वायदंडे,सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्रीमती रेखा भाले, महाव्यवस्थापक (मासं) श्री. प्रविण वाघ, व्यवस्थापक (मासं) श्री. विजय भोकरे आदी उपस्थित होते.

## कल्याण मंडलातर्फे सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कल्याण मंडलातर्फे त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमानिमित्ताने व्यासपीठावर सर्व महिला अधिकारी व कर्मचारी उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी अभियंता सौ. पूनम रोकडे उपस्थित होत्या. तर प्रमुख वक्त्या म्हणून लघुलेखिका सौ. स्मिता पेवेकर, कल्याण पश्चिम विभागाच्या उपव्यवस्थापक (मासं) सौ. सुनिता वानखेडे, उपव्यवस्थापक (मासं) सौ. विद्या जोशी व सहाय्यक लेखापाल सौ. अनिता झोपे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार सहाय्यक अभियंता श्री. जी.के. पानपाटील यांनी मानले.

याप्रसंगी बोलतांना सौ. पेवेकर म्हणाल्या की, भारताच्या आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले असून त्यांच्यामुळेच देशात स्त्रियांना शिक्षण घेण्याचे व सामाजिक जीवनात पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करण्याचे हक्क मिळाले. यावेळी सौ. वानखेडे, म.रा.मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे कार्याध्यक्ष श्री. अशोक सोनवणे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास मुख्य अभियंता श्री. रामराव मुंडे, अधीक्षक अभियंता श्रीकांत जलतारे, कार्यकारी अभियंते सर्वश्री विजयानंद काळे, दिपक लहामगे व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नांदेड परिमंडलात महिला विद्युत सहाय्यकांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा



महिला विद्युत सहाय्यकांचा सत्कार करताना मुख्य अभियंता श्री. करपे, अधीक्षक अभियंता श्री. हामंद व अन्य

नांदेड येथील लघु प्रशिक्षण केंद्रात महिला विद्युत सहाय्यकांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा नुकतीच घेण्यात आली. या कार्यशाळेत नांदेड परिमंडलातील ५४ महिला विद्युत सहाय्यकांनी सहभाग नोंदवला.

या कार्यशाळेचे उद्घाटन मुख्य अभियंता श्री. सतिश करपे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नांदेडचे अधीक्षक अभियंता श्री. डी.डी.हामंद, शहर उपविभाग-२ च्या उपकार्यकारी अभियंता श्रीमती आर.ए.कुलकर्णी, परिमंडल तेजस्विनी समितीच्या प्रमुख उपकार्यकारी अभियंता श्रीमती लिना नागपूरे उपस्थित होत्या.

महिलांच्या अंगी असणारी सचोटी, कर्तव्यदक्षपणा आणि व्यावहारिक दृष्टीकोन या सद्गुणांचा महावितरण व्यवस्थापनाला निश्चितच फायदा होईल, अशी अपेक्षा मुख्य अभियंता श्री. करपे यांनी व्यक्त केली. यावेळी उपकार्यकारी अभियंता श्रीमती आर.ए.कुलकर्णी यांनीही मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेसाठी जनसंपर्क अधिकारी श्री. मोहन दिवटे, कनिष्ठ अभियंता श्री. नारायण चव्हाण, सहाय्यक विधी अधिकारी श्री. एस.एम.निंबुरगे यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले.

## अंधांसाठी कार्य करणाऱ्या नॅबला आर्थिक सहाय्य

नाशिक शहर मंडल कार्यालयात कार्यरत असलेले सहाय्यक अभियंता श्री. विवेक जाधव यांनी आपल्या सेवानिवृत्तीचे औचित्य साधून अंधांसाठी काम करणाऱ्या नॅब या संस्थेला ११,१११/- रूपये तसेच मंडल कार्यालयाचे कार्यकारी अभियंता श्री.चंद्रकिशोर हुमणे यांनी ५० शालींचे वितरण केले.

यावेळी नाशिक शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री.आर.डी.चव्हाण, नॅबचे श्री. मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, श्री.जाधव,श्री.गडाख आदी उपस्थित होते.यावेळी बोलतांना श्री. मुनशेट्टीवार म्हणाले की, महावितरणसोबतच येथे काम करणारे अधिकारी व कर्मचारी हे नेहमीच आपले सामाजिक कर्तव्य पार पाडतात. ही चांगली बाब आहे. यावेळी अधीक्षक अभियंता श्री. चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वश्री. विवेक मवाडे व श्रीप्रकाश राजभोज आदींनी परिश्रम घेतले.

## महावितरणची प्रगती देशाच्या ऊर्जा क्षेत्रातील एक आदर्श



पुणे मध्यवर्ती ग्राहक सुविधा केंद्राची पाहणी करतांना केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. सिन्हा व सोबत मुख्य अभियंते सर्वश्री वसंत गुर्जर, निळकंठ वाडेकर, सुधीर वडोदकर व प्रभाकर देवरे.

वीजग्राहकांसाठी जागतिक तंत्रज्ञानाच्या सोयी सुविधा तसेच वसुली व वीजहानीनुसार असणारे भारनियमनाचे वेळापत्रक अतिशय उपयुक्त व समाधानकारक आहे. सद्यस्थितीत देशाच्या ऊर्जाक्षेत्रात महावितरणची प्रगती व वाटचाल आदर्शवत असल्याचे प्रतिपादन केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. पी. के. सिन्हा यांनी केले.

पुनर्रचित गतिमान विद्युत विकास व सुधारणा (R-APDRP) कामांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. सिन्हा यांनी नाशिक, अहमदनगर, पुणे येथे दौरा केला व कामांची पाहणी केली. यात पुणे व नाशिक परिमंडलातील विविध कार्यालयांना भेटी दिल्या. अहमदनगर येथील विद्युत भवन परिसरात उभारण्यात आलेल्या ३३/११ किव्हो उपकेंद्राची पाहणी केली. तसेच या ठिकाणी उभारण्यात आलेली जी.आय.एस. यंत्रणा व या योजनेंतर्गत झालेल्या कामाची पाहणी करून त्याचा आढावा घेतला.

महावितरणच्या विविध उपाययोजनांनी ३५ टक्क्यांवरून १४.६७ टक्के एवढी कमी झालेली वीजहानी लक्षणीय असल्याचे मत श्री. सिन्हा यांनी आढावा बैठकीत बोलतांना व्यक्त केले. देयकांची वसुली व वीजहानीच्या आधारे तयार केलेले भारनियमनाचे वेळापत्रक अतिशय उपयुक्त आहे. हा देशातील आदर्श प्रयोग आहे. त्यातही या वेळापत्रकाची फिडरनिहाय अंमलबजावणी करून महावितरणने प्रामाणिक वीजग्राहकांना न्याय दिल्याचे श्री. सिन्हा म्हणाले.

पुण्यात २४×७ सुरु असणाऱ्या ४० सिटर मध्यवर्ती ग्राहक सुविधा केंद्राला श्री. सिन्हा यांनी भेट दिली. वीजग्राहकांनी केलेल्या तक्रारींच्या निवारणासाठी होणाऱ्या वेगवान प्रक्रियेची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रशंसा केली. तसेच ग्राहक सुविधा केंद्राच्या भेटीत ग्राहकसेवेची कार्यपद्धती व उपलब्ध असलेल्या विविध सेवांची माहिती जाणून घेतली. वीजग्राहकांसाठी एक खिडकी योजना पद्धत व ऑनलाईन तंत्रज्ञानाचा वापर याचा विशेष उल्लेख करीत श्री.सिन्हा यांनी महावितरणचे कौतुक केले.

यावेळी मुख्य अभियंते सर्वश्री व्ही. पी. गुर्जर (आर-एपीडीआरपी, मुंबई), के.व्ही.अजनाळकर (नाशिक परिमंडल), निळकंठ वाडेकर (पुणे परिमंडल), सुधीर वडोदकर (भांडुप परिमंडल), प्रभाकर देवरे (महापारेषण, पुणे) तसेच अधीक्षक अभियंते सर्वश्री अनिल भोसले, शिवाजी चाफेकरंडे, प्रभाकर हजारे, सौ. रंजना पगारे, उपमहाव्यवस्थापक (मातं) श्री. योगेश खैरनार, कार्यकारी अभियंते सर्वश्री रवींद्रनाथ पुरोहित, यशवंत कांबळे, हरिश्चंद्र बिरनवार, मधुकर नान्हे आदींसह केंद्रीय व राज्य शासनाच्या ऊर्जा मंत्रालयाचे व महावितरणचे अभियंता व अधिकारी उपस्थित होते.

## कायमचा विद्युत पुरवठा खंडित असलेल्या थकबाकीदारांकडून ६२ लाख वसूल



श्री. घुगल हे ग्राहकाचा सत्कार करताना.

अमरावती मंडलातील कायमचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आलेल्या ३० हजार ४६५ ग्राहकांना केवळ नोटीसा पाठवून ६१ लाख ९६ हजार ४९६ रुपयांच्या थकबाकीची वसुली करण्यात आली.

अमरावती मंडलाच्या २३ उपविभागातील कायमचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आलेल्या ग्राहकांकडे अनेक वर्षापासून थकबाकी आहे. या थकबाकी वसुलीसाठी अधीक्षक अभियंता श्री. दिलीप घुगल यांनी विशेष कार्यक्रम राबविला. यासाठी ३०,४६५ नोटीस तयार करण्यात येऊन त्यात पीसी, एमआर रुट आणि डीटीसी कोड तसेच व्याजाची एकूण रक्कम इत्यादी माहिती देण्यात आली. नोटीसची एकच प्रत तयार करून पीसी, डीटीसी नुसार यादी तयार करून यादीवरच नोटीस मिळाल्याची ग्राहकाची सही घेण्यात आली. त्यामुळे हा सर्व खर्च प्रति नोटीस केवळ एक रुपया एवढाच झाला. यावेळी १ लाख ४० हजार रुपये थकबाकी भरणारे श्री. मुदगल या ग्राहकाचा अधीक्षक अभियंता श्री. घुगल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नोटीसा पाठविण्यात आलेल्या ग्राहकांपैकी २,६९३ ग्राहकांनी ६१ लाख ९६ हजार ४९६ रुपयांचा भरणा केला.

अधीक्षक अभियंता श्री. दिलीप घुगल, विधी सल्लागार श्री.पी.बी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंते सर्वश्री विलास नलबलवार, राजेंद्र गिरी, बी.के. शर्मा, दिलीप मोहोड, प्रणाली विश्लेषक श्री.प्रविण काटोले व व्यवस्थापक (वि व ले) श्री. ए. डब्ल्यू. वानखडे यांनी प्रयत्न केले.

## औरंगाबाद चाचणी विभागात कार्यशाळा संपन्न

हॅण्डहेल्ड युनिटद्वारे इन्फ्रारेड मीटरचे वाचन कसे घ्यावे, याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी औरंगाबाद येथील चाचणी विभागात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सिंगल फेज इन्फ्रारेड मीटरचे वाचन घेऊन ते संगणकात लोड करणे, त्या माहितीच्या आधारे वेगवेगळे अहवाल तयार करणे तसेच रिमोटद्वारे वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांच्या मीटरचे वाचन कशा पध्दतीने घ्यावे व वीजचोरी कशी उघडकीस आणावी आदी विषयावर औरंगाबाद ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. आजीनाथ सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मुख्य अभियंता श्री. शंकर शिंदे व कार्यकारी अभियंता श्री. एस.जी. कटके उपस्थित होते. या कार्यशाळेला औरंगाबाद ग्रामीण विभागातील अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

## वीजहानी नियंत्रणात आणण्यासाठी मल्टी मिटर बॉक्स



मल्टी मीटर बॉक्सची पाहणी करताना मुख्य अभियंता श्री सतिश करपे, सोबत कार्यकारी अभियंता श्री. अग्रवाल, श्री पुनसे व अन्य.

नांदेड शहर विभागातील विजेची हानी आणि वीजचोरी नियंत्रणात आणण्यासाठी लुधियाना पॅटर्ननुसार सर्वाधिक वीजहानी व वीजचोरी असणाऱ्या भागात 'मल्टी मिटर बॉक्स' बसविण्याची योजना राबविण्यात येत असून आतापर्यंत या योजनेत शहरातील विविध ठिकाणी ९० बॉक्स बसविण्यात आले आहेत.

या योजनेनुसार ग्राहकांच्या दारावर किंवा भिंतीवर बसविण्यात आलेले वीज मीटर काढून रस्त्यावरील विजेच्या खांबावर मल्टी मीटर बॉक्स मध्ये बसविण्यात येत आहेत. एका मल्टी मीटर बॉक्समध्ये बारा वीज मीटर बसविण्याची सोय आहे. या योजनेमुळे ग्राहक आता आपल्या मीटरमध्ये फेरफार करुन विजेची चोरी करण्याची शक्यता कमी झाली आहे. नांदेड शहर विभागात ही योजना राबविण्यात येत असून यात एक हजार मल्टी मीटर बॉक्स द्वारे सुमारे १२ हजार ग्राहकांचे मीटर घराऐवजी आता रस्त्यावर येणार आहेत. या उपक्रमाला काही ठिकाणी ग्राहकांचा विरोध झाला. मुख्य अभियंता श्री.सतिश करपे आणि कार्यकारी अभियंता श्री.डी.एच.अग्रवाल यांनी यासाठी ग्राहकांना विश्वासात घेतले. मल्टी मीटर बॉक्स बसविताना मुख्य अभियंता श्री. करपे हे साईटवर जाऊन प्रत्यक्ष कामाची पाहणी करीत असल्यामुळे या कामाला वेग आला आहे.

मल्टी मीटर बॉक्सच्या प्रयोगामुळे भविष्यात भारनियमन मुक्त फिडर्सची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. मुख्य अभियंता श्री सतिश करपे व अधीक्षक अभियंता श्री. डी.डी.हामंद यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यकारी अभियंता श्री.डी.एच.अग्रवाल,उपकार्यकारी अभियंता श्री.पी.आर.पुनसे, कनिष्ठ अभियंता श्री.महमद अब्दुल रौफ व त्यांच्या कर्मचाऱ्यांनीही याकामी मोठे योगदान दिले.

## बारामती परिमंडलात तीन एटीपी सुरू

बारामती परिमंडलात विविध ठिकाणी नुकत्याच एटीपी (एनी टाईम पेमेंट) मशीन सुरू करण्यात आल्या आहेत. बारामती शहरात बारामती विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.किशोर पाटील यांच्या हस्ते एटीपी मशीनचे उद्घाटन करण्यात आले. अकलूज शहरात अकलूज विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.श्रीनिवास चटलावार यांच्या हस्ते एटीपी मशीनचे उद्घाटन करण्यात आले. बारामती विभागाअंतर्गत येणाऱ्या इंदापूर शहरातही एटीपी मशीन सुरू करण्यात आली आहे.

## लेखा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा



कार्यशाळेस मार्गदर्शन करताना मुख्य अभियंता श्री. शंकर शिंदे, उपमहाव्यवस्थापक श्री. प्रकाश अहिरे, श्रीमती कांचन राजवाडे व अन्य.

औरंगाबाद ग्रामीण मंडलांतर्गत येणाऱ्या कन्नड व औरंगाबाद ग्रामीण विभागाच्या लेखा विभागातील सहाय्यक लेखापाल, निम्नस्तर लिपिक व उच्चस्तर लिपिकांना वीज बिलिंगबाबत माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी बोलतांना मुख्य अभियंता श्री. शंकर शिंदे म्हणाले की, ग्राहकांच्या मीटरचे वाचन बाह्यस्त्रोत एजन्सीद्वारे करण्यात येत असल्यामुळे काही ठिकाणी अनियमितता आढळून येते. यामुळे कंपनीच्या महसुलाचे नुकसान होते. त्यासाठी बी-३० एरर रिपोर्ट, एक्सपेक्शनल रिपोर्ट, ॲबनॉर्मल रिपोर्ट, क्रॉस चेक इन व्हॅलीडेशन रिपोर्ट, एमआय रिपोर्टसह डाटा पंचींगमध्ये होणाऱ्या चुका वेळीच शोधून काढाव्यात. याप्रसंगी सहाय्यक महाव्यवस्थापक (वि व ले) श्री. प्रकाश अहिरे यांनीही मार्गदर्शन केले.

कार्यशाळेस उपमहाव्यवस्थापक (मातं) श्रीमती कांचन राजवाडे, वरिष्ठ व्यवस्थापक (वि व ले) श्री. दत्तू कर्डिले, कार्यकारी अभियंता श्री. अनिलकुमार नितनवरे, प्रणाली विश्लेषक श्री. दिलीप मालखेड उपस्थित होते.

## भांडुप परिमंडलात मोफत डोळे तपासणी शिबीर

भांडुप नागरी परिमंडल आणि वासन आय केअर हॉस्पीटलच्या संयुक्त विद्यमाने परिमंडलातील कर्मचारी, अधिकारी तसेच त्यांच्या कुटुंबियांकरिता मोफत डोळे तपासणी शिबीराचे आयोजन नुकतेच करण्यात आले.

वासन आय केअर हॉस्पीटलच्या अद्ययावत सोयी-सुविधांनी युक्त असलेल्या ठाणे, मुलुंड आणि वाशी येथील रूग्णालयामध्ये डोळे तपासणी शिबीर घेण्यात आले. ठाणे नागरी मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. कैलास हुमणे यांच्या हस्ते मुलुंड येथील हॉस्पीटलमध्ये शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, महावितरणचा कर्मचारी हा सतत वीज ग्राहकांच्या सेवेत कार्यरत असतो. त्यामुळे स्वत:च्या आरोग्याकडे काळजीपूर्वक लक्ष देणे त्यास शक्य होत नाही. परिणामी आरोग्याच्या तक्रारी वाढत जातात नेमकी ही बाब लक्षात घेऊन व्यवस्थापन कर्मचाऱ्यांच्या हितांचे अनेक आरोग्यदायी उपक्रम सातत्याने राबवत असते.

केवळ कर्मचारीच नव्हे तर त्यांच्या कुटुंबियांनीही या शिबीराचा लाभ घेतला. याप्रसंगी सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अविनाश पाटोळे (मुंबई) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच वासन आय केअरचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री.घनश्याम कदम व परिमंडलातील सर्व कार्यकारी अभियंते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.ललित गायकवाड यांनी केले.

## महावितरणमध्ये ६५ वा प्रजासत्ताक दिन साजरा



ध्वजारोहण प्रसंगी संचालक श्री. मारुती देवरे व अन्य

महावितरण व महानिर्मिती कंपन्यांचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथे ६५ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. तसेच विविध परिमंडलातही प्रजासत्ताक दिन उत्साहाने साजरा करण्यात आला.

प्रकाशगड येथे महावितरणचे संचालक (संचालन) श्री. मारुती देवरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री.पी.यु.शिंदे, महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) श्री. चंद्रकांत थोटवे, कार्यकारी संचालक ( सांघिक नियोजन) श्री. शरद दाभाडे, कार्यकारी संचालक (वाणिज्य) श्री.अभिजीत देशपांडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनानिमित्ताने गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी, विनाअपघात वाहन चालविणारे वाहन चालक व विजेत्या खेळाडूंचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तसेच दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्ताने भ्रष्टाचारमुक्त भारत या विषयावर घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील उत्कृष्ट घोषवाक्यासाठी सहाय्यक दक्षता अधिकारी श्री. कैलास पटेकर यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन व आभार वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं/ कामगार विभाग) श्री.प्रसाद राजाध्यक्ष यांनी मानले.

**नागपूर परिमंडल :** ६५ व्या प्रजासत्ताक दिनी प्रभारी कार्यकारी संचालक तथा नागपूर शहर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. मोहन झोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीच्यावतीने माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेत गुणवत्ता प्राप्त कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला.

**कोल्हापूर परिमंडल :** प्रजासत्ताक दिनानिमित्त कोल्हापूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. रमेश घोलप यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुख्य अभियंता श्री. घोलप यांच्या हस्ते २९ जणांचा सत्कार करण्यात आला.

**जळगाव परिमंडल :** जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. प्रसाद रेशमे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंते सर्वश्री अशोक शिंदे व मनोहर लांडे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जळगाव परिमंडलांतर्गत येणाऱ्या धरणगाव येथे प्रजासत्ताक दिनानिमित्ताने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी २८ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. 'कामाचा ताण व तणाव कमी व्हावा' या विषयावर आयोजित चर्चासत्रात कार्यकारी अभियंता श्री. गौतम गायकवाड, धरणगाव महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक श्री. सी.एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## महावितरणच्या प्रदर्शनी स्टॉलला गृहमंत्री ना. श्री. आर. आर. पाटील यांची भेट



मुख्य अभियंता श्री. घोलप हे गृहमंत्री ना. श्री. आर.आर. पाटील यांना माहिती देताना व अन्य.

सांगली जिल्ह्यातील कवठे महांकाळ येथे भारत निर्माण लोकमाहिती अभियान अंतर्गत प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनीमध्ये लावण्यात आलेल्या महावितरणच्या स्टॉलला महाराष्ट्राचे गृहमंत्री ना.श्री.आर.आर.पाटील यांनी भेट दिली. महावितरणतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध ग्राहकाभिमुख सेवांची माहिती ना. श्री. पाटील यांनी यावेळी जाणून घेऊन महावितरणच्या कामांची प्रशंसा केली.

या प्रदर्शनीमध्ये वीजचोरीबाबत शिक्षेची तरतूद, विजेचे अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी, विजेचे दरपत्रक, वीज बिलांचा सविस्तर तपशील, नवीन वीज जोडणी घेण्याबाबतचे पत्रक व त्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे, महावितरणकडून शेतकरी व इतर सर्व ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सुविधा इत्यादींबाबत माहिती असलेले पोस्टर्स लावण्यात आले आणि पॅम्प्लेट वितरीत करण्यात आले.

## राष्ट्रीय स्पर्धेत महावितरणच्या कबड्डी संघाला कांस्यपदक



कांस्यपदक पुरस्कार मिळविणारा महावितरणचा कबड्डी संघ

अखिल भारतीय विद्युत नियंत्रण मंडळातर्फे पटियाला येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महावितरणच्या कबड्डी संघाने तिसरे स्थान पटकावून कांस्यपदक संपादित केले. या स्पर्धेत देशभरातील विद्युत कंपन्यांचे २० संघ सहभागी झाले होते. संघ प्रशिक्षक श्री. शरद महाडिक यांनी तर संघ व्यवस्थापक श्री. संतोष विश्वेकर यांनी आपापली जबाबदारी उत्तमपणे पार पाडली.

या कबड्डी संघातील सहभागी खेळाडू : कर्णधार श्री. निलेश नाईक (पुणे), उपकर्णधार श्री. देवेंद्र शिंदे (भांडुप), अजय शिंदे (भांडुप) किरण देवाडिगा (मुंबई), राहुल सणस (मुंबई), विश्वास पाटील (मुंबई), धीरज रोकडे (मुंबई), गुंडोपंत गावडे (कोल्हापूर), रविंद्र बिरनाळे (कोल्हापूर), सुनिल सावंत (कोल्हापूर), नितेश अवचट (नागपूर), परिक्षित शिंदे (रत्नागिरी).यापूर्वीही या कबड्डी संघाने मागील वर्षी विविध ठिकाणी झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये लक्षणीय कामगिरी बजावलेली आहे.

## Think Over it ....

१. **राष्ट्रपुरुष/ थोर व्यक्तींच्या जयंत्या तसेच राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम साजरे करण्याबाबत - अधिकारी/ कर्मचारी यांची उपस्थिती.**

शासनाने परिपत्रक क्र. संकीर्ण २०११/१०६९/प्र.क्र.४१८/२९ दि. १६/११/२०१३ अन्वये स्वयंप्रेरणेने सर्व अधिकारी व कर्मचारी राष्ट्रपुरुष/थोर व्यक्तींच्या जयंत्या तसेच राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रमांना उपस्थित राहतील याबाबतच्या योग्य उपाययोजना करण्याबाबत व या कार्यक्रमांना उपस्थिती हा कार्यालयीन शिस्तीचा भाग समजण्या बाबत सूचना पारित केलेल्या आहेत.

(प्रशासकीय परिपत्रक क्र. ४७५ दिनांक १०/१२/२०१३)

२. **Hon'ble High Court decision in Criminal Application No. 4163 of 2013.**

The Hon'ble High Court, Mumbai Bench at Aurangabad has given their decision on 07/10/2013 in a case No.4163/2013 filed by Shri Navalkishor S. Jaiswal, Jr. Engineer, Tirthapuri and quashed the F.I.R. filed under SC ST Act against him.

[Administrative Circular No.476 dated 17/12/2013]

३. **कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचाराकरिता अग्रीम रक्कम मंजूर करण्याच्या अधिकारांबाबत.**

मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त) आणि कार्यकारी संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचा-यांना अग्रीम रक्कम मंजूर करण्याकरिता प्रदान करण्यात आलेले अधिकार सुधारित करण्यास मंजुरी दिलेली आहे.

(प्रशासकीय परिपत्रक क्र. ४७७ दिनांक ०४/०१/२०१४)

४. **Revising the pre-requisites for the posts of Jr. Operator and Jr. Technician.**

The Managing Director in consultation with Director (Finance), Director (Operations) and Director (Projects) has accorded approval to modify the educational qualification for the post of Junior Operator and Junior Technician.

[ Correction Slip No.55 dated 21/01/2014 to Classification & Recruitment Regulations, 2005 ]

## Commercial Circulars

**Subject:** Special Amnesty Scheme (Vishesh Abhay Yojana) under Maharashtra Industrial Policy 2013 for closed industrial units which are beyond the scope of rehabilitation.

-Delegation of Powers for implementation of scheme.

(Commercial Circular No. 217 dt. 17/01/2014)

In view of powers delegated for One Time Settlement, the Competent Authority has decided to delegate same for implementation of Special Amnesty Scheme to pass the benefit to HT as well as LT industrial consumers as under.

1. Delegation of powers to pass on the benefit to closed industrial HT as well as LT consumers under Special Amnesty Scheme are as under.

| Sr. No. | Level | Members | Amount Involved |
|---|---|---|---|
| 1 | HO Recovery Committee | Managing Director<br>Director (Finance)<br>Director (Operations) | Above Rs. 20 Lakhs in HT/LT cases |
| 2 | Zonal Recovery Committee | Chief Engineer<br>General Manager(F&A)/<br>Sr. Manager (F&A) | More than Rs. 10 Lakhs upto Rs. 20 Lakhs in HT/LT case |
| 3 | Circle Recovery Committee | Superintending Engineer<br>Manager F&A) | More than Rs. 2 Lakhs upto Rs.10 Lakhs in HT/LT cases |
| 4 | Divisional Recovery Committee | Executive Engineer<br>Dy. Manager (Revenue) | Up to Rs. 2 Lakhs in HT/LT cases |

**S. H. Dhantole**
Chief Engineer (Commercial)

**सूचना :** परिपत्रकाचा सारांश फक्त माहितीकरिता देण्यात आला असून, प्रत्यक्ष अंमलबजावणीपूर्वी तसेच कायदेशीर स्पष्टीकरणासाठी संदर्भाधीन परिपत्रक संपूर्णपणे विचारात घेणे आवश्यक आहे.

**Our website http:/www.mahadiscom.in**

# विविध परिमंडलात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा



ग्राहकांना माहिती देताना शहर विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.रामदास कांबळे व अन्य

राज्यात नुकताच राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला. ग्राहकाला आपल्या अधिकाराची जाणीव व्हावी व त्याला मिळणाऱ्या सेवेचा दर्जा उंचवावा, यासाठी विविध ठिकाणी प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**बारामती परिमंडल :** सोलापूर शहर विभागाच्या वतीने राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला. शहरातील विविध शासकीय विभागांनी रंगभवन येथे स्टॉल उभारून नागरिकांना आपआपल्या विभागांची माहिती दिली. महावितरणनेही या ठिकाणी स्टॉल उभारून वीजग्राहकांना आपल्या विविध सेवांविषयी माहिती दिली. ऊर्जा बचत, नवीन वीजजोडणीसाठीची ऑनलाईन पद्धत, वीजबिले ऑनलाईन भरण्याची सोय, विद्युत सुरक्षितता, वीजबिले कसे समजून घ्यावे, विविध सेवांबाबत तक्रार कुठे करावी आदींबाबत कार्यकारी अभियंता श्री.रामदास कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्राहकांना समर्पक माहिती दिली.

**पुणे परिमंडल :** शिवाजीनगर ग्राहक सुविधा केंद्रात राष्ट्रीय ग्राहक दिन नुकताच साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजीनगरचे कार्यकारी अभियंता श्री. आनंद रायदुर्ग होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उच्चदाब ग्राहक श्री. तेजस भस्मे, लघुदाब ग्राहक श्री. हेमंत भंगाळे, श्री. संजय दुग्गड, ग्राहक सुविधा केंद्राचे उपकार्यकारी अभियंता श्री. प्रदीप डहाके आदींची उपस्थिती होती. यावेळी ग्राहकांचे हक्क, कायदा व महावितरणची सेवा आदींबाबत माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला उपकार्यकारी अभियंता श्री. विजय नाळे, श्री. भाऊसाहेब सावंत आदींसह अधिकारी, अभियंता, कर्मचारी, ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जळगाव परिमंडल :** राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त स्थानिक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात नंदूरबार मंडल कार्यालयातर्फे ग्राहकांना मार्गदर्शन करण्यासाठी स्टॉल लावण्यात आला.

या स्टॉलचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमती सुमन राव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रेडिओ फ्रिक्वेन्सी, इन्फ्रारेड मीटर, ऑनलाईन वीज बिल भरणे, नवीन जोडणीसाठी अर्ज करण्याबाबतची माहिती ग्राहकांना देण्यात आली. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. अविनाश पाटोळे, कार्यकारी अभियंता श्री. शिवाजी भालशंकर, उपकार्यकारी अभियंता श्री. नरेंद्र कोतवाल आदी उपस्थित होते.

# गौरव

## कु. संगिता देशमुख यांना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार



पुणे येथील कु. संगिता केशवराव देशमुख यांना राज्य शासनाने सन २००९-१० चा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार नुकताच जाहीर केला आहे. कबड्डी क्रीडा प्रकारात शालेय, राज्य व राष्ट्रीयस्तरावरील विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल कु. संगिता देशमुख यांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. कु. संगिता देशमुख पुण्याच्या कोथरूड विभागात कनिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहे. त्यांनी कबड्डी संघासाठी पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले आहे. तसेच वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धांमध्ये दोनवेळा आणि १७ व १९ वर्षे वयोगटातील स्पर्धांमध्येही कु. संगिता देशमुख यांनी प्रतिनिधित्व केले आहे.

कु.संगिता यांनी मिळविलेल्या या पुरस्काराबद्दल महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक श्री.अजय मेहता यांनी प्रशस्तीपत्र देऊन तिचा गौरव केला आहे.

## प्राजक्ता व पल्लवी लक्षणे अमेरिकेस रवाना



कु. पल्लवी



कु. प्राजक्ता

अमेरिका येथील टेक्सस विद्यापीठात मास्टर इन इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमासाठी कु.प्राजक्ताची निवड होऊन ती अमेरिकेस रवाना झाली आहे. कु.प्राजक्ताने नागपूर विद्यापीठातून बी.ई. (इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन) पदवी मिळविली व गुणवत्तेच्या आधारे कॅम्पस निवड होऊन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या टेक महिंद्रा या कंपनीत दोन वर्षे कार्यरत होती.

कु. पल्लवी ही बारावी नंतर पदवी व पदव्युत्तर शिक्षणाकरिता अमेरिकेला गेली. शिक्षण पूर्ण करून सध्या ती नॅशनल इन्सुट्रमेंटस, ऑस्टिन (टेक्सस) येथे उच्चपदावर कार्यरत आहे. दोन्ही बहिणीना त्यांच्या यशाबद्दल हार्दिक शुभेच्छा. या दोघी प्रकाशगड मुख्यालयातील वितरण विभागात कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता श्री. यादव लक्षणे यांच्या सुकन्या आहेत.

## रमेश गोविलकर यांना 'समाज भूषण' पुरस्कार



कल्याण येथून प्रसिध्द होणाऱ्या ठाणे जिल्हा कुंभार मित्र या मासिकातर्फे सन-२०१३ चा 'समाज भूषण' पुरस्कार श्री. रमेश गोविलकर यांना देण्यात आला.

श्री. गोविलकर यांनी आपल्या कामासोबतच कुंभार समाजात चालू असलेल्या अनिष्ट जुन्या प्रथा व परंपरा बंद करून लग्नातील अवास्तव खर्च, मुलांचे शिक्षण याबाबत सातत्याने प्रबोधन करीत आहेत. त्यांच्या या कामाची दखल घेऊन हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. श्री. रमेश गोविलकर हे गोरेगाव विभागीय कार्यालयात सहाय्यक लेखापाल म्हणून कार्यरत आहे.

## जगदिश्वर मोदी भारतीय सैन्यात लेफ्टनंटपदी नियुक्त



भारतीय सैन्य अकादमी (IMA) डेहराडून येथे दीड वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर जगदिश्वर ना. मोदी याची भारतीय सैन्यात लेफ्टनंटपदी नियुक्ती झाली असून दार्जिलिंग येथे त्याला पहिले पोस्टींग मिळाले आहे.

जगदिश्वर याने रूईया महाविद्यालयातून बी.एससी. चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या सी.डी.एस. (Combined Defense Service) ही परीक्षा उत्तीर्ण केली. त्याने डेहराडून येथील भारतीय सैन्य अकादमीमधून दीड वर्षाचे प्रशिक्षण नुकतेच पूर्ण केले.

भांडुप नागरी परिमंडलांतर्गत येणाऱ्या वागळे इस्टेट विभागात कार्यरत असणाऱ्या उपव्यवस्थापक (मा.सं.) सौ. मिनल ना. मोदी यांचा तो मुलगा आहे.

## श्री. विनोद माने यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्कार



कोल्हापूर येथील अविष्कार फाऊंडेशनतर्फे सहाय्यक अभियंता श्री. विनोद माने यांना २०१३ यावर्षीचा उत्कृष्ट अभियंता पुरस्कार देण्यात आला.

श्री. माने यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील ग्राहकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण करणे, ग्राहकांना तत्परतेने वीज जोडण्या देणे तसेच ग्राहकसेवेला प्राधान्य देऊन ग्राहक व महावितरणमध्ये सौजन्यपूर्ण वातावरण निर्माण करण्यात मोठे सहकार्य केले. श्री. माने हे हुपरी उपविभागीय कार्यालयात सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत आहेत.

## प्रतिक भोसले उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत



अमेरिकेतील मायामी शहर (फ्लोरिडा राज्य) येथील फ्लोरिडा आंतरराष्ट्रीय विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रतिक बबन भोसले हा नुकताच रवाना झाला. या विद्यापीठाने मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (एमआयएस) या विषयाच्या एक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी त्याची निवड केली आहे. चि. प्रतिक याने पुणे विद्यापीठातून बीई (संगणक) अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. पुण्याच्या भोसरी विभागात कार्यरत असलेले सहाय्यक लेखापाल श्री. बबन रा. भोसले यांचा तो मुलगा आहे.

## प्रशासकीय वृत्त

### बढती

| नाव | पदनाम | कार्यालय |
|---|---|---|
| श्री. बी. के. जनवीर | मुख्य अभियंता | गुणवत्ता नियंत्रण, नागपूर परिमंडल |
| श्री. एस.के. ताकसांडे | मुख्य अभियंता | अमरावती परिमंडल, अकोला |
| श्री. बी.बी. जाडकर | मुख्य अभियंता | मालमत्ता व्यवस्थापन कक्ष, मुंबई |

### बदली

| नाव | पदनाम | सध्याचे कार्यालय | बदलीनंतरचे कार्यालय |
|---|---|---|---|
| श्री. एस.पी.नागटिळक | मुख्य अभियंता | पायाभूत आराखडा, मुंबई | कोकण परिमंडल, रत्नागिरी |
| श्री. अरूण रणखांबे | मुख्य अभियंता | कोकण परिमंडल, रत्नागिरी | गुणवत्ता नियंत्रण, पुणे परिमंडल |
| श्री. एस.एस. धांडे | मुख्य अभियंता | अमरावती परिमंडल, अकोला | वितरण विभाग, मुंबई |
| डॉ. एम.एस. केळे | मुख्य महाव्यवस्थापक | वाणिज्य विभाग, मुंबई | तांत्रिक आस्थापना, मुंबई |
| श्री. एस.एच. धनतोले | मुख्य अभियंता | वितरण विभाग, मुंबई | वाणिज्य विभाग, मुंबई |

# वीजखांबावर चढण्यासाठी घडीच्या शिडीची निर्मिती



देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी वीजखांबावर चढण्यास सुलभ असलेल्या घडीच्या शिडीची पुणे परिमंडलातील लघु प्रशिक्षण केंद्राने निर्मिती केली आहे.

वीजयंत्रणेतील बिघाड दुरुस्ती किंवा देखभालीसाठी जनमित्रांना वीजखांबावर चढावे लागते. उन्हाळ्यात किंवा पावसाळ्यात वीजखांबावर चढणे अतिशय जिकरीचे असते. त्यामुळे सुमारे २० फूट लांबीची लाकडी शिडीची शहरी भागात चारचाकी आणि प्रामुख्याने ग्रामीण भागात दुचाकीवरून वाहतूक करावी लागते.

यावर उपाय म्हणून जनमित्रांसाठी एचडीपी पाईप व सुमारे २०० फूट जाड सुताच्या दोरीचा वापर करून २० फूट उंच शिडी तयार करण्यात आली. वाहतुकीसाठी अतिशय सुलभ या घडीच्या शिडीला एक फूट उंचीच्या १८ पायऱ्या असून सुमारे १२५ किलोग्रॅम वजन पेलण्याची या शिडीची क्षमता आहे. वीजखांबावर ही शिडी लावण्यासाठी डीओ ऑपरेटींग रॉडचा (डीओ- ड्राप आऊट) वापर करण्यात आला. शिडीच्या टोकाला असलेला लोखंडी हूक या रॉडच्या सहाय्याने वीजखांबाच्या क्लॅम्पला अडकविल्यानंतर शिडीवरून वीजखांबावर सहजपणे चढता येते. तसेच शिडीला वीजखांबाला बांधून ठेवण्यासाठी ठराविक अंतराने दोर लावण्यात आले आहेत. त्यामुळे ही शिडी वीजखांबापासून दूर हलण्याचा किंवा सरकण्याचा धोका नसतो. शिडीच्या टोकावर असलेला वेगळा दोर कंबरेला बांधून जनमित्र सुरक्षितपणे वीजखांबावर काम करू शकतात. या शिडीची एका पिशवीमधून वाहतूक करणे शक्य असल्याने लाकडी शिडीच्या वाहतुकीमध्ये येणारे अडथळे व पर्यायाने दुरुस्तीच्या कामात होणारा विलंब दूर होणार आहे.

पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. निळकंठ वाडेकर, प्रशिक्षण केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक (नाशिक) श्री. चंद्रशेखर येरमे, अधीक्षक अभियंता श्री. अंकुश नाळे यांच्या मार्गदर्शनात लघु प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक श्री. मनोहर कोलते यांनी वरिष्ठ तंत्रज्ञ श्री. भगवान खाडे यांच्या सहकार्याने या शिडीची निर्मिती केली आहे.

लघु प्रशिक्षण केंद्राने जनमित्रांसाठी तयार केलेली घडीची शिडी.
सोबत श्री. मनोहर कोलते व श्री. भगवान खाडे.

Printed & Published by Shri. Ramdas Sampat Dotonde of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
Printed at **Jyotirling Enterprises**, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक: राम दोतोंडे
मुख्य महाव्यवस्थापक (सांघिक संवाद)
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)